दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.२५ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 25 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 10 ● Pages 4 ● Rate 4 Rs

**प्रतिनिधी नेमणे आहे**

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा , तालुका , सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .




# ही शेवटची लढाई : प्रत्येकाने मुंबईला या

## राजकीय नेत्याचे ऐकून गावात थांबू नका-मनोज जरांगे

**बीड (वृत्तसंस्था)-मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्ट रोजी मुंबईत धडकणार आहेत. तत्पूर्वी मनोज जरांगे यांनी बीड येथील भाषणात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना इशारा दिला आहे. तसेच बीडमध्ये मराठा समाजाच्या सभेत डीजे वाजवू दिला नाही, यावर प्रतिक्रिया देताना बीडमध्ये कुठेही डीजे वाजवू देणार नाही हे नक्की. सत्ता येत असते, ती बदलत असते हे लक्षात ठेवा, असा इशारा जरांगे पाटलांनी दिला आहे.**



मनोज जरांगे म्हणाले, आपल्याला बीडच्या सभेत डीजे वाजवू दिला नाही, ठीक आहे. पण आमचा डीजे वाजवू दिला नाही, यापुढे बीडमध्ये कोणाचाही डीजे वाजवू देणार नाही हे नक्की. देवेंद्र फडणवीस यांनी जरा पोलिसांना आदेश दिले असतील आणि पोलिस जर चुकीचे काम करत असतील तर तसे करू नका. एवढी विनंती करूनही जर एखाद्या पोलिस अधिकाऱ्याला काही करायचे असेल तर त्या महादेव मुंडेंच्या मारेकऱ्यांना शोधा, असे आवाहन देखील जरांगे यांनी केले.मनोज जरांगे म्हणाले, गडबड घोटाळा करु नका. त्यामुळे मराठा समाजावर संकट घोंघावत आहे. ते संकट आता मोडून काढायचे आहे. तुमच्या आणि माझ्या भावनांचा सत्ताधाऱ्यांनी वापर करुन घेतला. मराठ्यांची ताकद मोठी आहे, पण आपण विचारांनी चाललो नाही. त्यामुळे आपल्या मुलांचे नुकसान झाले. प्रत्येकाने आपला वापर केला. उभ्या पिढ्यांचे वाटोळे झाले. यापुढे आपण विचारांनी चालायचे. बीडमधील मराठा समाज आता एक झाला आहे, गर्व वाटेल असे काम करतोय. आज बीडची गर्दी पाहून सत्ताधारी बेजार झालेत. आता असेच मुंबईला जायचे.देवेंद्र फडणवीसांनी नुकतेच २९ जाती या ओबीसी आरक्षणामध्ये घेतल्या, त्यांची मागणी नसतानाही त्यांना दिले. पण मराठ्यांची मागणी असतानाही मराठ्यांना आरक्षण दिले जात नाही. सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी केली जात नाही, ही पोटदुखी कशासाठी? असा प्रश्न मनोज जरांगे यांनी विचारला.तुमच्या जातीचा आमदार, खासदार आहे म्हणून तुमच्या पोराबाळांची फी माफ होणार नाही, त्याला नोकरी मिळणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने मुंबईला यावे. कुणा राजकीय नेत्याचे ऐकून गावात थांबू नका. तुमच्या आमदार, खासदारांना मुंबईला यायला सांगा. सरपंचापासून सगळ्या नेत्यांना मुंबईला यायला सांगा. आता ही शेवटची लढाई असेल, असेही यावेळी बोलताना मनोज जरांगे म्हणाले.

### मनोज जरांगेंच मुख्यमंत्र्यांना आव्हान

**बीडमध्ये आमच्या सभेमध्ये अडचणी निर्माण केल्या जातात, जरा थांबा, आम्ही मुंबईत येतोय. त्यावेळी काय करायचे ते करा असे थेट आव्हान मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले. आम्ही शांततेत मुंबईला जाणार आणि शातंतेत मराठा आरक्षण घेणार, मराठा समाजावर आलेले संकट मोडून काढणार. सरकारने जर मराठ्यांना आरक्षण दिले, आमच्या मागण्या मान्य केल्या तर आम्ही मुंबईला कशाला येऊ? इथूनच मंत्रालयावर गुलाल उधळतो.**

### फडणवीस मराठा-ओबीसी भांडण लावत आहेत

**मनोज जरांगे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस म्हणतात त्यांचा डीएनए ओबीसी आहे, मग शेतकरी ओबीसी नाही का? त्यांना कर्जमाफी करा. देवेंद्र फडणवीस हे ओबीसी आणि मराठ्यांमध्ये भांडण लावत आहेत. आपण जातीयवादी नाही, त्यांनी तसा अपप्रचार केला. आता देवेंद्र फडणवीसांनी कितीही प्रयत्न केला तरी मराठा आणि ओबीसींमध्ये भांडण होणार नाही.**

# तळोदा तालुक्यातील रोझवा प्लॉट गावातील दुर्दैवी घटना

## मृतदेहाला नदीच्या पुरातून वाहून नेण्याची वेळ

**नंदुरबार । दिपक गोसावी**



तळोदा तालुक्यातील धवळीविहीर ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या रोझवा प्लॉट येथील ग्रामस्थांच्या यातना काही केल्या संपता संपत नाहीत. गावात पूल नसल्यामुळे येथील नागरिकांना मृत्यूनंतरही वेदना सहन कराव्या लागत असल्याचे भयावह वास्तव समोर आले आहे.

गावात पूल नसल्यामुळे येथील ग्रामस्थांना मृतदेह नदीच्या पलीकडील स्मशानभूमीत नेण्यासाठी वाहत्या पाण्यातून जीव धोक्यात घालून जावे लागते. गावातील खत्री रेवाजी तडवी (वय अंदाजे ६५) यांचे २२ ऑगस्ट रोजी निधन झाले. दुसऱ्या दिवशी, २३ ऑगस्ट रोजी, त्यांची अंत्ययात्रा निघाली. परंतु, स्मशानभूमी गावापासून नदीच्या दुसऱ्या बाजूला असल्यामुळे नागरिकांना मोठा अडथळा निर्माण झाला.गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात झालेल्या जोरदार पावसामुळे नदीला पूर आला होता आणि पाण्याचा प्रवाह खूप वेगवान होता. अशा परिस्थितीतही, पर्याय नसल्यामुळे ग्रामस्थांनी मृतदेह वाहत्या नदीच्या पाण्यातून नेण्याचा निर्णय घेतला. यावेळी, त्यांनी दोरीचा आधार घेत अत्यंत धोकादायक परिस्थितीत नदी पार केली. ही घटना गावातील मूलभूत सुविधांच्या अभावामुळे होणाऱ्या गंभीर समस्या दर्शवते.स्थानिक प्रशासनाने या घटनेची दखल घेऊन रोझवा प्लॉट येथे तातडीने पुलाची सोय करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. जेणेकरून भविष्यात अशा दुःखद घटना पुन्हा घडणार नाहीत आणि नागरिकांना मृत्यूनंतरही सन्मानाने अंतिम संस्कार करता येतील.

# सावरपाडा-धनपूर पुलाचे काम निधीअभावी रखडले; गावकऱ्यांचा जीवघेणा प्रवास

**नंदुरबार । दिपक गोसावी**



तळोदा तालुक्यातील सावरपाडा आणि धनपूर या गावांना जोडणाऱ्या पुलाचे बांधकाम निधीअभावी रखडल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गेल्या आठ महिन्यांपासून हे काम सुरू असून, निधीअभावी ते अपूर्ण राहिले आहे. त्यामुळे, पावसाळ्यात निझरा नदीला पूर आल्यावर ग्रामस्थांना जीव धोक्यात घालून पाण्यातून प्रवास करावा लागत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून या भागातील नागरिकांना नदीपात्रातूनच प्रवास करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन आमदार राजेश पाडवी यांनी पुढाकार घेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून या पुलाला मंजुरी मिळवली. निझरा नदीवर उभारण्यात येत असलेल्या या पुलाची लांबी १० मीटर असून, त्यात सात गाळे आहेत. या पुलासाठी अंदाजे ३.५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता नितीन वसावे यांनी माहिती दिली आहे. त्यांच्या मते, पुलाचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे, परंतु निधी नसल्यामुळे पुढील काम थांबले आहे. निधीची मागणी करणारा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला असून, निधी उपलब्ध झाल्यावर काम पुन्हा सुरू केले जाईल, असे त्यांनी सांगितले.नुकताच सातपुड्याच्या परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे निझरा नदीला मोठा पूर आला. त्यामुळे, सावरपाडा आणि धनपूर दरम्यान अडकलेल्या गावकऱ्यांना पुराच्या पाण्यातून जावे लागले. एका चारचाकी वाहनालाही पुराच्या पाण्यातून बाहेर काढण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. प्रशासनाने नदीपात्रात न जाण्याची सूचना दिली असली तरी, पूल अपूर्ण असल्यामुळे गावकऱ्यांना नाईलाजाने हा जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. या समस्येमुळे ग्रामस्थ संतप्त झाले असून, पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी जोर धरत आहे.

# मुख्य निवडणूक आयुक्त खोटारडे सरकारच्या दबावाखाली काम करत आहेत

**मुंबई (वृत्तसंस्था)**-निवडणूक आयुक्त यांच्यावर महाभियोग आणलेच पाहिजे, कारण की इतका खोटारडा आणि एखाद्या सरकारच्या दबावाखाली येणारा निवडणूक आयुक्त आपण पाहिला असेल. तर ते आपण ज्ञानेश कुमार रुपानी यांच्या रुपाने पाहिला आहे, असे काँग्रेस नेते नाना पटोले यांनी म्हटले आहे.नाना पटोले म्हणाले की, लोकशाहीमध्ये स्थानिक नागरिकांची जनभावना लक्षात घेऊन त्या पद्धतीच्या विकासाला चालना दिली गेली पाहिजे.स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांच्या भावना सरकारने समजून घेतल्या पाहिजे. नितीन राऊत काय बोलले हे त्यांचे व्यक्तिगत मत असू शकते. मुंबई आणि नागपूरमध्ये रस्त्यावर इतकं पाणी साचते की नाव लावावी लागते. सरकारकडून विकासाच्या नावाने लुट सरकारकडून सुरू असून जनतेच्या पैशाची उधळपट्टी सुरू आहे. त्यावर लक्ष दिले पाहिजे.नाना पटोले म्हणाले की, निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषद घेत खोटारडेपणा केला आहे. हा खऱ्या अर्थाने लोकशाहीवर आघात करण्याचा प्रकार आहे. संध्याकाळी ५ वाजेनंतर जे रात्री ११ वाजेपर्यंत मतदान झाले त्यांचे फुजेट आम्हाला हवे आहे. कोणत्या बूथवर किती मतदान झाले हे पाहण्यासाठी आम्हाला हे फुजेट हवे आहे. पण हे सांगत आहे हे फुटेज दिल्याने माता-भगिनींची इज्जत जाणार आहे. अहो आम्ही काय बोलवे यावर.निवडणूक आयोग जर या पद्धतीने केंद्र सरकार आणि भाजपचे पाप लपवत असेल तर हा लोकशाहीवर एक आघात आहे. म्हणून मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोग आणलाच पाहिजे, ही आमची भूमिका आहे.नाना पटोले म्हणाले की, आमचे नेते राहुल गांधी हे रस्त्यावरची लढाई लढत आहेत. ते बिहारमध्ये रस्त्यावर उतरले आहेत. त्यानंतर संसदेत आम्ही ही लढाई कायम ठेवणार असून त्यानंतर सुप्रीम कोर्टात जाणार आहोत. बावनकुळे यांचा अभ्यास थोडा कमी आहे.

संपादकीय

# शहरांचे पर्यावरणीय आरोग्य ढासळतेय...

बदलत्या हवामानाचा परिणाम शहरांवर मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे शहरातील कथित सामान्य सुरक्षित जीवन सातत्याने बाधित होत आहे. आजघडीला कधी शहरे पाण्याने तुंबतात, तर कधी पाण्याच्या टंचाईचा सामना करतात. शहरांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याचा प्रश्न गंभीर असतो. शहरांच्या पायाभूत सुविधांवर भर देताना त्यांचे पर्यावरणही जपले पाहिजे, तरच शहरातील नागरिकांचे जीवन सुसह्य होईल.पावसाळा काही प्रमाणात अशांतता आणतो; परंतु अस्थिरता ही एक नवी सामान्य बाब बनत आहे, जी बदलत्या हवामानाचे लक्षण आहे. आपली शहरे वाढता वीज वापर, पाण्याची मागणी आणि बिघडत्या सार्वजनिक पायाभूत सुविधांशी झुंजत आहे. ऊर्जा आणि पाणी प्रणालींवर दबाव आणत आहे. कमी होत जाणारी हिरवळ, गायब होणारे तलाव, तुंबलेले नैसर्गिक नाले आणि खराब कचरा व्यवस्थापन या सर्वांमुळे मुसळधार पावसात शहरात पूर येतो आणि उष्णतेच्या लाटेत पाण्याची टंचाई निर्माण होते. या पार्श्वभूमीवर काही शहरांमध्ये झालेले काम इतरांना निश्चितच प्रेरणा देणारे आहे. निळ्या आणि हिरव्या पायाभूत सुविधांमध्ये नैसर्गिक किंवा मानवनिर्मित हिरवीगार जागा आणि पाणवठ्यांचा समावेश आहे. त्याचे अनेक फायदे आहेत. 'तलावांचे शहर' उदयपूर हे हिरव्या आणि पाण्याच्या एकात्मिक पायाभूत सुविधा काय करू शकते याचे एक उत्तम उदाहरण आहे. पावसाळ्यात, रामसर वेटलँड सिटी म्हणून ओळखले जाणारे उदयपूरचे तलाव वनस्पती आणि जलजन्य प्राण्यांनी भरलेले असतात. पृष्ठभागावरील प्रवाह कमी करतात. भूजल पुनर्भरण करतात. पर्यावरण थंड करतात आणि जवळच्या मोठ्या तलावांमधून येणारे पाणी शोषून घेतात. पहिले म्हणजे शहराच्या मास्टर प्लॅनमध्ये हिरव्या आणि निळ्या जागांचा समावेश केला पाहिजे. त्याचा विकास सामान्यतः २० वर्षांसाठी केला जातो. बेकायदेशीर भू–वापर बदलाविरुद्ध स्पष्ट कायदेशीर तरतुदी असायला हव्यात. त्याचप्रमाणे २०२७ पर्यंत एक हजार शहरी जंगले विकसित करण्याचे उद्दिष्ट असलेल्या नगर वन योजनेची अंमलबजावणी वेगात केली पाहिजे. दुसरे म्हणजे शहरांनी घरगुती सांडपाण्याचा पुनर्वापर व्यवस्थापित करण्यासाठी आणि वाढवण्यासाठी विशेष योजना तयार केल्या पाहिजेत. अशा योजना स्थानिक जलाशय, तलाव तसेच जमिनीसारख्या शहरी जलस्रोतांचे सांडपाणी प्रदूषणापासून संरक्षण करू शकतात. त्यामुळे परिसंस्था त्यांच्या आवश्यक सेवा प्रभावीपणे प्रदान करू शकतात.ऊर्जा, पर्यावरण आणि पाणी परिषदेने केलेल्या एका अभ्यासात असे सुचवण्यात आले आहे, की एका मजबूत योजनेत पाण्याचे संतुलन आणि गुणवत्ता मूल्यांकन, पिण्यायोग्य नसलेल्या पाण्याच्या उद्देशांसाठी पुनर्वापराचे पर्याय ओळखणे, पुनर्वापरासाठी व्यावहारिक लक्ष्ये निश्चित करणे, प्रक्रिया केलेल्या वापरलेल्या पाण्यासाठी वाटप यंत्रणा परिभाषित करणे आणि अंमलबजावणीसाठी संस्थात्मक रचना तयार करणे यांचा समावेश असावा. शहरांनी निळ्या आणि हिरव्या पायाभूत सुविधांच्या बांधकाम आणि देखभालीसाठी स्थिर वित्तपुरवठा आणि नागरिकांचा सहभाग सुनिश्चित केला पाहिजे. इंदूर आणि अहमदाबादमध्ये महानगरपालिका रोखे आणि राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियानांतर्गत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बांधण्यासाठी वापरले जाणारे हायब्रिड वार्षिकी मॉडेल काय शक्य आहे ते दर्शवतात. सामान्यतः वनीकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या राष्ट्रीय भरपाई वनीकरण व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण निधीचा वापर विद्यमान शहरी जंगले आणि हरित कॉरिडॉरचे संरक्षण करण्यासाठी केला पाहिजे. नैसर्गिक किंवा मानवनिर्मित पायाभूत सुविधांचे संचालन आणि देखभाल यांसारख्या क्रियाकलापांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे. पाणीपुरवठा, कचरा संकलन, विल्हेवाट, उद्याने आणि इतर हिरव्या जागांची देखभाल यांसारख्या सेवांचा खर्च भागवण्यासाठी वापरकर्ता शुल्क आकारले पाहिजे. कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी अनुदाने सुरूच ठेवली पाहिजेत; परंतु शहरांनी नागरी जबाबदारीची मागणी करण्यास मागेपुढे पाहू नये. विकसित देशांमधील कोणतेही शहर सार्वजनिक सहभाग न घेता लवचिक पायाभूत सुविधा उभारू शकलेले नाही. भारतीय शहरे विकास, रोजगार आणि समृद्धीचे चालक आहेत; परंतु त्यांना हवामान धोक्यांचाही सामना करावा लागत आहे. आपण शहरांचे पर्यावरणीय पायामध्ये गुंतवणूक करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचे भविष्य धोक्यात आणू. गेल्या काही दशकांमध्ये भारताने जलद शहरीकरण पाहिले आहे. भारतातील शहरांची वाढ मोठ्या प्रमाणात अनियोजित आहे. त्यामुळे अनेक आव्हाने आणि शहरी अराजकता निर्माण झाली आहे. अनियोजित शहरी वाढीचा सर्वात विनाशकारी परिणाम म्हणजे विद्यमान पायाभूत सुविधांवर दबाव. पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक आणि वीज यांसारख्या मूलभूत सुविधांना वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. परिणामी, पायाभूत सुविधांवर जास्त ताण येतो. यामुळे गर्दी, अपुरी सेवा आणि जीवनमान कमी होते. अनियोजित शहरी विकासामुळे वाहतूक कोंडी आणि वायू प्रदूषणात मोठी वाढ झाली.ग्रामीण भागातील लोक मोठ्या संख्येने शहरांमध्ये स्थलांतरित होत आहेत. यामुळे परवडणाऱ्या घरांच्या पर्यायांची तीव्र कमतरता निर्माण झाली आहे. परिणामी, विविध शहरी भागात झोपडपट्ट्या आणि अनौपचारिक वस्त्या उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे राहणीमान आणि सामाजिक असमानता कमी होत आहे. भारतातील अनियोजित शहरी विकासामुळे पर्यावरणाचे नुकसान झाले आहे. लोक अनेकदा वनजमिनीवर अतिक्रमण करतात. त्यामुळे जैवविविधतेचे नुकसान होते. अनियंत्रित बांधकाम, अयोग्य कचरा व्यवस्थापन आणि अनियंत्रित औद्योगिकीकरण प्रदूषण मातीची धूप आणि पाण्याची कमतरता निर्माण करते. शहरांची अनियोजित वाढ सामाजिक असमानता वाढवते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी शाश्वत शहरी नियोजन, पायाभूत सुविधा विकास आणि सामाजिक कल्याण कार्यक्रमांना एकत्रित करणारा बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. महानगरांमध्ये मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. कधी कधी मुसळधार पाऊस प्राणघातक ठरू शकतो. पावसाळ्यात मुंबई, चेन्नई आणि बंगळूरुसारख्या शहरांमधील रस्ते पाण्याखाली जातात आणि सामान्य लोकांना अडचणींना तोंड द्यावे लागते. भारतीय शहरांमध्ये दर पावसाळ्यात पूर येणे सामान्य आहे. जलद शहरीकरणामुळे, शहरातील तलाव गायब होत असून नाले कचऱ्याने भरली आहेत. अलीकडच्या वर्षांमध्ये अशा पुरांपूर्वी दिल्ली आणि बंगळूरुमध्ये पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली. तिथे पाणी साठवण्याच्या जागा कमी झाल्या आहेत. या वर्षी पावसाळ्यापूर्वी बंगळूरुमध्ये असे पाणी संकट निर्माण झाले, की लोकांना आवश्यक कामांसाठी खासगी टँकरमधून जास्त किमतीत पाणी खरेदी करावे लागले. जून महिन्यात देशाची राजधानी दिल्लीमध्येही अशीच परिस्थिती दिसून आली. जूनमध्ये कडक उन्हामुळे पाण्याचे संकट इतके बिकट झाले, की लोकांना पाण्यासाठी रांगेत उभे राहावे लागले. बंगळूरुप्रमाणेच दिल्लीतील लोकांनाही पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागले. या परिस्थितीचा विचार करून शहरांच्या पर्यावरणीय संतुलनाचे नियोजन केले, तर काहीसा दिलासा मिळू शकतो.

# मुंबईकर नागरिकांच्या समस्या सोडविण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे

## मुंबई उपनगरे जिल्हा सहपालकमंत्री श्री.मंगलप्रभात लोढा यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मुंबई महानगराचा कायापालट करण्याचे काम सुरू आहे. विकास कामांबरोबरच मुंबईकर नागरिकांना उच्च दर्जाच्या मुलभूत सेवा सुविधा पुरविण्याची आग्रही भूमिका राज्य शासनाने घेतली आहे. मुंबईकर नागरिकांच्या समस्या सोडविण्याठी महानगरपालिका अधिकाऱ्यांनी प्राधान्य द्यावे, असे निर्देश राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्हा सहपालकमंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी दिले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम पूर्व विभाग कार्यालयात सहपालकमंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली जनता दरबाराचे आज (दिनांक २२ ऑगस्ट २०२५) आयोजन करण्यात आले होते. स्थानिक आमदार श्री. अबू आझमी, स्थानिक आमदार श्रीमती सना मलिक, उप आयुक्त (परिमंडळ ५) श्री. देवीदास क्षीरसागर, एम पूर्व विभागाचे सहायक आयुक्त श्री. उज्वल इंगोले यांच्यासह विविध अधिकारी यावेळी उपस्थित होते.



सहपालकमंत्री श्री. लोढा यांनी जनता दरबारात नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्यांच्यासमवेत संवाद साधला. सुमारे दोनशे पेक्षा जास्त नागरिकांनी समस्या मांडल्या. प्रामुख्याने रस्ते दुरूस्ती, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, सुशोभीकरण, घनकचरा व्यवस्थापन, अनधिकृत बांधकामे, सीसीटीव्ही बसविणे, जलवाहिनी बदलणे, सार्वजनिक प्रसाधनगृहांची उभारणी, इमारतींचा पुनर्विकास यांसारख्या विविध समस्यांचा यामध्ये समावेश होता. या समस्यांवर संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश श्री. लोढा यांनी दिले.

श्री. लोढा पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी मुंबईकर नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यासाठी जनता दरबार घेऊन नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. जनता दरबारात आलेल्या नागरिकांच्या समस्यांचे त्वरित निवारण करावे. समस्या निराकरणात असलेल्या अडचणी जाणून घेऊन त्या लवकर सोडवाव्यात, असे निर्देशदेखील श्री. लोढा यांनी दिले.

# शहिद राजगुरू महान क्रांतिकारक

महाराष्ट्रातील पुणे येथील खेड गावांमध्ये (आताचे राजगुरू नगर) पुणे २४ ऑगस्ट १९०८ ला शिवराम हरी राजगुरू नावाचा महान क्रांतिकारक जन्माला आला.जनुकाय या पृथ्वीवर लखलखत्या सुर्यप्रकाशाचा जन्म झाला की काय असे सर्वांना भासु लागले. कारण जन्मतःच त्यांच्या चेहऱ्यावर क्रांतीची ज्वाला धगधगत होती आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात एक तेजोमय लखलखता प्रकाश प्रगट झाला व क्रांतीची मशाल संपूर्ण भारतात सुर्या प्रमाणे प्रज्वलीत झाली.राजगुरूनी संस्कृत भाषेत शिक्षण घेतले.लघुसिध्दांत कौमुदीचा अभ्यास केला. त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी आणि कन्नड भाषा चांगलीच अवगत होती.क्रांतीकारी विचारसरणीचे चंद्रशेखर आझाद आणि लोकमान्य टिळक यांच्या विचारांच्या प्रभावामुळे अल्पवयातच राजगुरू इंग्रजाची घृणा करू लागले व स्वतंत्र लढ्यात उडी घेतली.राजगुरू हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशनचे सदस्य होते.यानंतर चंद्रशेखर आझाद, भगतसिंग,सुखदेव थापर घनीष्ठ मित्र झाले आणि क्रांतीला नवी दिशा व चालना देवून क्रांतीची ज्वाला प्रज्वलित केली.आज शहिदांच्या पुण्यायीनेच देशाची १४० कोटी जनता मोकळा स्वास घेत आहे.अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने,प्रयत्नाने व बलीदानाने १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली. १९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले. त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन सायमन परत जाच्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला.हि बाब सायमन कमिशनचे अधिकारी सँडर्स यांना पचली नाही.लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले.यामुळे



सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली व जमाव पांगवण्यासाठी सँडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला.यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारत शोकाकुल झाला.हे दुःख राजगुरू, भगतसिंह आणि सुखदेव यांना पहावले नाही.त्यामुळे क्रांतीकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी कंबर कसली व लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याची योजना आखली.लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी राजगुरू,भगतसिंग,आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलुन जॉन सँडर्स यांच्या निवासस्थानी गेले.सँडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले.संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सँडर्सला जागीच ठार केले व तेथुन पलायन केले.यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले.शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली.यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली.भारत स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही विसरणार नाही.जो पर्यंत सुर्य–चंद्र, आकार–पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोन्हिही विसरणार नाही. राजगुरू,भगतसिंग आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून १४० कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते.परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते.कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशाच्या विकासापेक्षा स्वतःच्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात.इंग्रजांनी भारताला लुटले ही बाब सत्य आहे.परंतु देशातील भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांनी देशाला हजारोपटीने लुटले आहे त्यामुळे देशात अनेक गंभीर समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.यामुळे आज देशात मुलभूत सुविधांचा अभाव, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, कुपोषण, महागडे शिक्षण इत्यादींचा सामना आज देशातील १४० कोटी जनतेला करावा लागतो. राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा जोपर्यंत तुम्ही देशविकासासाठी, जनतेच्या हितासाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी संपूर्ण ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही. क्रांतिकारक,शहिद अल्पवयात हसत–हसत फासावर का चढले यामागचा त्यांचा एकच उद्देश होता.तो म्हणजे मातृभुमिची रक्षाकरून सर्वसामान्यांना न्याय मिळावा व भारत स्वतंत्र होवून सुख शांती निर्माण व्हावी व सुजलाम सुफलाम व्हावा.परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की लोका सांगे ग्यान व स्वतः कोरडे पाषाण यामुळेच या कृषी प्रधान देशात मुठभर राजकीय पुढारी वाममार्गाने पैसा कमवुन करोडपती व अरबोपती झाल्याचे दिसून येते.भारतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब हा गरीबीच्या खाईत जात आहे.या संपूर्ण बाबींची जान राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली मानल्या जाईल.राजकीय पुढाऱ्यांना फक्त शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य उपयोग करून जनसेवा केली पाहिजे. तेंव्हाच शहिद राजगुरू यांना खरी श्रद्धांजली ठरेल व शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल.संपुर्ण देश शहिदांना आपली आदरांजली अर्पण करीत आहे.परंतु शहिदांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे.कारण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष देशसेवेपेक्षा फक्त स्वतःचे हीत साधण्याचा प्रयत्न जास्त असतो.त्यामुळे सावधान राजकीय पुढाऱ्यांनो कोणतेही कार्य करतांना शहिदांचे अनुकरण अवश्य करावे व त्यांच्या बलीदानाला कोठेही ठेच किंवा तडा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी.हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी कोटी प्रणाम,शहिद राजगुरू यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी वृक्षलागवड केली पाहिजे.मुख्यत्वेकरून राजकीय पुढारी,सरकार,प्रशासन, स्थानिक प्रशासन व सामाजिक संस्था यांनी राजगुरू यांच्या जयंतीनिमित्त आठवण म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे.यामुळे संपूर्ण सृष्टी प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल व झाडांच्या पानांत, फुलात, फळात आपल्याला शहिद राजगुरू सह संपुर्ण शहिदांचे अवश्य दर्शन होईल.जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगा शहिद राजगुरू यांना कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**

# सक्षम उदंचन केंद्रांमुळे ४ दिवसांत १,६४५कोटी लिटर पाण्याचा उपसा

## १,६४५कोटी लिटर पाण्याचा उपसा करण्यासाठी उदंचन पंप एकूण ७६१ तास कार्यरत

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईची वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता अतिवृष्टीच्या काळात महानगरात कोसळणा–या पावसाच्या पाण्याचा निचरा प्रभावीपणे होण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रात एकूण ६ उदंचन केंद्र (पंपींग स्टेशन) कार्यरत आहेत. या उदंचन केंद्रामध्ये एकूण ४३ पंप असून यापैकी प्रत्येक पंपाची क्षमता प्रति सेकंदाला ६,००० लिटर पाण्याचा उपसा करण्याची आहे. याचाच अर्थ सर्व पंपांची एकत्रित क्षमता ही प्रत्येक सेंकदाला २ लाख ५८ हजार लिटर एवढ्या पाण्याचा उपासा करण्याची आहे. दिनांक १६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळपासून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पावसाला सुरुवात झाली. तेव्हापासून ते दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंतच्या साधारणपणे ४ दिवसांच्या कालावधीत सर्व उदंचन केंद्रामधून तब्बल १६,४५१.५५ दशलक्ष लिटर (१,६४५.१५५ कोटी लिटर) एवढया पाण्याचा उपसा करण्यात आला. तुलनात्मक विचार केल्यास ८,०४.६ कोटी लिटर एवढी जलधारण क्षमता असणा–या तुळशी तलावातील पाण्याच्या दुपटीपेक्षा अधिक पाण्याचा उपसा गेल्या ४ दिवसांत करण्यात आल्याचे मुंबई महानगरपालिकेकडून सांगण्यात आले.दिनांक १६ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट २०२५ या साधारपणे ४ दिवसांच्या कालावधी दरम्यान पावसाच्या पाण्याचा सर्वाधिक उपसा हा इर्ला उदंचन केंद्राद्वारे करण्यात आला. या केंद्राद्वारे ३,७६८.४८ दशलक्ष लिटर एवढया पाण्याचा उपसा करण्यात आला. या खालोखालक्लिव्हलँड बंदर उदंचन केंद्रातून २,९०६.०२ दशलक्ष लिटर, गजधरबंधउदंचन केंद्रातून २,८७०.११दशलक्ष लिटर,लवग्रोव्ह उदंचन केंद्रातून २,८२६.५०दशलक्ष लिटर,हाजी अलीउदंचन केंद्रातून २,३७९.७८ दशलक्ष लिटर आणि ब्रिटानिया उदंचन केंद्रातून १७००.६७ दशलक्ष लिटर पाण्याचा उपसा करण्यात आला. यानुसार सर्व ६ उदंचन केंद्राद्वारे १६,४५१.५५दशलक्ष लिटर पाण्याचा उपसा करण्यात आला. यानुसार पाण्याचा उपसा करण्यासाठी सर्व ६ उदंचन केंद्रामध्ये कार्यरत असलेल्या पंप हे दिनांक १६ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट २०२५ या ४ दिवसांच्या कालावधी दरम्यान सर्व पंपांचा एकत्रितरित्या विचार केल्यास एकूण ७६१ तास व ३८ मिनिटे कार्यरत होते.बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रात पडणा–या पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी हाजीअली,लव्हग्रोव्ह (वरळी),क्लीव्हलँड बंदर (वरळी गाव),ब्रिटानिया (रे रोड),ईर्ला (जुहू) आणि गजदरबंध (सांताक्रूज) या प्रत्येक ठिकाणी एक याप्रमाणे ६ उदंचन केंद्रे कार्यरत असून यात एकूण ४३ पंप कार्यरत आहेत. पावसाचे व उदंचन केंद्रांमध्ये वाहून येणा–या पाण्याचे प्रमाण लक्षात घेऊन हे पंप संगणकीय प्रणालीद्वारे कार्यरत होतात. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ६ उदंचन केंद्राची क्षमता व त्यांच्याद्वारे उपसा करण्यात आलेले पावसाचे पाणी याची दिवसनिहाय आकडेवारी व संक्षिप्त माहिती

दिनांक १६ ते १९ ऑगस्ट २०२५ दरम्यान उदंचन केंद्रांद्वारे उपसा करण्यात आलेले पावसाचे पाणी(दशलक्ष लिटर)

अ. क्र.उदंचन केंद्राचे नाव/पंपांची संख्या/प्रति सेकंद पाणी उपसा करण्याची कमाल क्षमता(लिटर)/ या क्रमाने माहिती

१.ईर्ला– ८/ ४८००० / ३,७६८.४८
२.क्लीव्हलँडबंदर– ७/ ४२००० /२,९०६.०२
३.गजदरबंध– ६/३६००० /२,८७०.११
४.लव्हग्रोव्ह– १०/ ६०००० / २,८२६.५०
५.हाजी अली–६/ ३६००० / २,३७९.७८
६.ब्रिटानिया– ६/ ३६००० / १,७००.६
७.एकूण– ४३/२,५८,०००/१६,४५१.५५

**५४० उदंचन पंपांद्वारे सहा तासात १८२.५ कोटी लिटर पाण्याचा उपसा**

सखल भागातील पावसाळी पाणी उपसण्यासाठी महानगरपालिकेने ५४० उदंचन पंप तैनात केले आहेत. मुंबई महानगरात आज, दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी अतमिुसळधार पाऊस कोसळत असून गेल्या ६ तासात या ५४० उदंचन पंपांद्वारे १८२.५ कोटी लिटर पाण्याचा उपसा करण्यात आला आहे. सर्व उदंचन पंपांचे चालन प्रशिक्षित मनुष्यबळाद्वारे तीन सत्रांमध्ये (शीफ्ट) करण्यात येत आहे.

**गत २४ तासात ३०० मिलीमीटरहून अधिक पाऊस**

मुंबईत काल १८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ८ ते १९ ऑगस्ट २०२५ सकाळी ८ वाजेपर्यंत (२४ तास) सर्वाधिक पाऊस झाला. पश्चिम उपनगरांमध्ये चिंचोली अग्निशमन केंद्र – ३६१ मिलीमीटर, कांदिवली अग्निशमन केंद्र – ३३७ मिलीमीटर, दिंडोशी वसाहत महानगरपालिका शाळा – ३०५ मिलीमीटर, मागाठाणे बस आगार – ३०४ मिलीमीटर, शहर विभागात पर्जन्य जलवाहिन्या कार्यशाळा, दादर – ३०० मिलीमीटर, बी. नाडकर्णी महानगरपालिका शाळा, वडाळा – २८२ मिलीमीटर, फ्रॉसबेरी जलाशय, एफ दक्षिण विभाग – २६५ मिलीमीटर, पूर्व उपनगरांमध्ये चेंबूर अग्निशमन केंद्र – २९७ मिलीमीटर, इमारत प्रस्ताव कार्यालय, विक्रोळी – २९३ मिलीमीटर, पासपोली महानगरपालिका शाळा, पवई – २९० मिलीमीटर व विणानगर महानगरपालिका शाळा – २८८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. १९ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे ४ ते सकाळी ८ वाजेपर्यंत (४ तास) १०० मिलिमीटरहून अधिक पावसाची नोंद झाली आहे. पश्चिम उपनगरांमध्ये चिंचोली अग्निशमन केंद्र – १०७ मिलिमीटर, वर्सोवा उदंचन केंद्र – १०६ मिलिमीटर, दिंडोशी वसाहत महानगरपालिका शाळा – ९७ मिलिमीटर, शहर विभागात फॉर्सबेरी जलाशय, एफ दक्षिण कार्यालय – १०९ मिलिमीटर, पर्जन्य जलवाहिन्या कार्यशाळा, दादर – १०३ मिलिमीटर, बी. नाडकर्णी महानगरपालिका शाळा, वडाळा – ९९ मिलिमीटर, नायर रूग्णालय – ९४ मिलिमीटर आणि पूर्व उपनगरांमध्ये मुलुंड अग्निशमन केंद्र – १०० मिलिमीटर, गव्हाणपाडा अग्निशमन केंद्र – ९५ मिलिमीटर आणि विणानगर महानगरपालिका शाळा – ९३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

# अल्पसंतुष्ट राहून आणि मळलेल्या वाटेने जाण्यापेक्षा कोकणातील युवकांनी स्फूर्ती घेऊन उच्च पदावर पोहोचावे–खासदार नारायण राणे

**मुंबई । प्रतिनिधी**

सार्वजनिक जीवनात व राजकारणात काम करताना मला मिळालेल्या पदांना मी न्याय देण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री असताना राज्यात व देशात मला जो नावलौकिक मिळाला, त्यामागे शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे यांचा हा निर्णय होता, हे मला सांगताना आजही अभिमान वाटतो.मला दिलेल्या संधीचा उपयोग मी नेहमीच जनतेच्या कल्याणाकरिता सामाजिक, शैक्षणिक व विधायक कामांसाठी केला. या काळात कोकणचा खूप विकास झाला, आताही होत आहे, पुढेही होईल असे उदगार खासदार नारायण राणे साहेब यांनी मुंबईत काढले. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने आयोजित वृत्तपत्र लेखक दिनाच्या कार्यक्रमात ते आपले मनोगत व्यक्त करीत होते. ७७ व्या दिनानिमित्त रवींद्र मालुसरे यांनी संपादित केलेल्या प्रेरक शिल्पकार या ग्रंथाचे आणि वृत्तपत्र लेखकांनी सोशल मीडियावर मुक्तपणे आणि निर्भीडपणे व्यक्त व्हावे यासाठी बनविलेल्या जागल्यांचा लोकजागर या ब्लॉगरचे प्रकाशन नारायण राणे यांच्या हस्ते करण्यात आले.



राणे आपल्या भाषणात पुढे असेही म्हणाले की,जीवनात यशस्वी होण्यासाठी आणि उच्च पदावर पोहोचण्यासाठी अल्पसंतुष्ट न राहता सतत संघर्ष केला पाहिजे. मळलेल्या वाटेने जाण्यापेक्षा यशस्वी झालेल्यांपासून स्फूर्ती घेऊन कोकणातील युवकाने पुढे जायला हवे. आयएएस आणि आयपीएस चे प्रमाण अत्यल्प आहे ते भविष्यात वाढायला हवे. त्यासाठी लागणारी संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी मी तयार आहे. मुलांनी उच्च शिक्षित व्हावे यासाठी मी सिंधुदुर्गात मेडिकल, इंजिनिअर कॉलेज काढले आहे. त्याची गुणवत्ता आता दिसत आहे. यापुढे आर्किटेक्ट असो किंवा अन्य कुणीही त्यांनी आयुष्यातील अपयशाच्या तक्रारीचा सूर न लावता आपली चाकोरी सोडून बाहेर पडायला पाहिजे तरच अधिक पैसे आणि नावलौकिक मिळेल. देशाच्या तिजोरीत मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असलेले शहर ३४ टक्के हिस्सा उचलते. याचा विचार मुंबई लगत असणाऱ्या कोकणी माणसांनी केला पाहिजे. कोकण हे समृद्ध बनले पाहिजे. मला राज्यात व केंद्रात जी-जी पदे मिळाली, त्याचा उपयोग मी महाराष्ट्राच्या व सिंधुदुर्ग जिल्ह्यात विकासासाठी केला, हे सांगताना मला अभिमान वाटतो.कोकणाच्या विकासाची अशी चर्चा होते, त्यामध्ये माझ्या नावाचाही उल्लेख होतो. त्याचे सर्व श्रेय मी कोकणी माणसालाच देतो. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या कार्यालयीन जागेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मी सरकारमध्ये असल्याने तुमच्या या मागणीसाठी मी संबंधितांसाठी बोलून तुमचा प्रश्न सोडवायचा प्रयत्न करील. असे आश्वासनही नारायण राणे यांनी सर्व ज्येष्ठ वृत्तपत्र लेखकांना दिले.

संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, २२ ऑगस्ट हा दिवस आम्हा वृत्तपत्र लेखकांसाठी उत्साहाचा आणि आनंदाचा असतो. राणे साहेब बेस्टचे चेअरमन असताना शिंदेवाडी येथील संघाच्या कार्यालयात आले होते. इतके जुने ऋणानुबंध आमचे त्यांच्याशी आहेत. आज हा कार्यक्रम राणे साहेबांची आठवण म्हणून त्याठिकाणी झाला असता, परंतु तेच कार्यालय आमच्याकडून महापालिकेने काढून घेतले आहे. अमृत महोत्सवी वाटचाल करणारी ही चळवळ निरंतर सुरु राहावी यासाठी राणेसाहेबांनी सरकारदरबारी आमच्यासाठी प्रयत्न करावा व मराठी माणसांच्या या संस्थेसाठी जीवदान द्यावे.

यावेळी संघाचे माजी अध्यक्ष मधू शिरोडकर, वि अ सावंत, विजय ना कदम, मनोहर साळवी यांच्यासह मधुकर कुबल, रमेश सांगळे, नितीन कदम, दिगंबर चव्हाण, सुनील कुवरे, राजन देसाई, श्रीनिवास डोंगरे, दिलीप ल सावंत, कृष्णा काजरोळकर,सतीश भोसले, एस एम बी न्यूज चॅनेल्स अँड प्रिंट मीडियाचे अशोक सावंत आदी पदाधिकारी आणि ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक उपस्थित होते.

# जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

तथाकथीत महाराज संग्राम भंडारे हे सातत्याने समाजात द्वेष पसरविणारे, भडकविणारे आणि राजकीय हेतूने लोकांच्या भावनांशी खेळ करणारे विधाने करत आहेत. अलिकडेच त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे वर्किंग कमिटी सदस्य तथा माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांचे विरोधात आम्हाला नथुराम गोडसे व्हावे लागेल.असे धक्कादायक विधान केले असून त्यातुन त्यांनी थोरात साहेबांना जिवे मारण्याची उघड धमकी दिली आहे.

याशिवाय भंडारे हे वारंवार थोरात कुटुंब व त्यांच्या समर्थकां विरुध्द चिथावणीखोर विधानं करत असून, सार्वजनिक जीवनात दहशत आणि वैमनस्याचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.



संग्राम भंडारे यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करुन कठोर कारवाई करावी.त्यांच्या सर्व भडकाऊ आणि द्वेषपूर्ण भाषणांची चौकशी करावी.अशा प्रकारच्या द्वेषपूर्ण कृत्यांना समर्थन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी.अशी मागणीचे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने देण्यात आले.याप्रसंगी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सौ.प्रभावती घोघरे,शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष दिप चव्हाण,जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस शामराव वाघस्कर,भिंगार काँग्रेसचे अध्यक्ष रिजवान शेख,सरचिटणीसअभिजीत कांबळे,अकोले ता.काँग्रेसचे अध्यक्ष शिवाजी नेहे, नासिर शेख - पाथर्डी अध्यक्ष,बाबासाहेब आढाव -राहुरी अध्यक्ष,अरुण म्हस्के नगर तालुका अध्यक्ष,सुनिल क्षेत्रे, मनोज गुंदेचा,फिरोज खान, मोसिन शेख,संजय झोडगे, संजय छत्तीसे,आल्तमस जरीवाला, फैय्याज शेख, शम्स खान,शहाजी भोसले राहुल उगले आदींसह अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटी व सर्व तालुका काँग्रेस अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.अहिल्यानगर जिल्ह्यातील जनता सजग आहे आणि कुणीही यापुढे धार्मिक किंवा राजकीय कारणाने गोंधळ निर्माण करण्याचा पयत्न केला तर त्यांच्यावर प्रशासनाने कठोर कारवाई करावी.आम्ही या विषारी वक्तव्यांचा जाहिर निषेध नोंदवत आहोत.आणि प्रशासनाकडुन तात्काळ कारवाईची अपेक्षा करत आहोत.

# स्टेशन रोड येथील गवळीवाडा परिसरात मैलामिश्रीत पाण्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शहरातील स्टेशन रोड परिसरातील गवळीवाडा, बहरू चाळ, संभाजी कॉलनी, स्वामी समर्थ कॉलनी या भागात मागील एक ते दोन वर्षांपासून नागरिकांना मैलामिश्रीत दूषित पाणीपुरवठा होत असल्याने आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पाण्यातून पोटाचे विकार, त्वचारोग तसेच इतर आजार उद्भवू लागल्याने नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे.

या गंभीर समस्येबाबत उपाययोजना करून नागरिकांना तातडीने स्वच्छ व पिण्यायोग्य पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी महापालिका पाणीपुरवठा विभागाचे अभियंता गणेश गाडळकर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी भाजपचे दत्ता गाडळकर, विशाल खैरे, विजय गायकवाड, सुरेश लालबागे आदींसह नागरिक उपस्थित होते.

गेल्या दोन वर्षांपासून या भागात नळातून येणारे पाणी अत्यंत घाण व मैलामिश्रीत असून, अनेकदा तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून दखल घेण्यात आलेली नाही. प्रत्यक्षात समस्येचे निराकरण झालेले



नसल्याने नागरिकांना इतर ठिकाणाहून स्वच्छ पाणी आणावे लागत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

वर्षानुवर्षे दूषित पाणीपुरवठा करणे म्हणजे नागरिकांच्या आरोग्याशी खेळणे आहे. महापालिकेने तातडीने लक्ष घालून ही समस्या दूर करावी, अन्यथा नागरिकांसोबत रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा उपस्थितांनी यावेळी दिला.

# पोलीस असल्याचा बनाव करून वृद्ध दांपत्याची चार लाख रुपयांनी फसवणूक

**वैजापूर । प्रतिनिधी**

पोलीस असल्याचा बनाव करून गंगापूर-छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर वृद्ध दांपत्याला फसवून त्यांचे चार लाख रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले गेले. दोन्ही आरोपी भरदिवसा, बुलेटसारख्या दुचाकीवरून आले आणि आम्ही पोलीस आहोत, पुढे दंगल सुरू आहे असे सांगत वृद्ध महिलेच्या बॅगेत दगड ठेवून दागिने चोरले.



भगूर येथील तारा प्रल्हाद चव्हाण (वय ६९) आणि त्यांचे पती प्रल्हाद चव्हाण हे गुरुवारी दुपारी १२:३० ते १:०० च्या दरम्यान भगूरहून छत्रपती संभाजीनगरकडे जात होते. महालगाव येथील एचपी पेट्रोल पंपाजवळ आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांना थांबवले. पोलीस असल्याचा बनाव करून त्यांनी तारा चव्हाण यांना अंगावरील दागिने बॅगेत ठेवा असे सांगितले. घाबरलेल्या वृद्ध दांपत्याने त्यांचे दागिने दिले. दागिने घेणाऱ्या आरोपींपैकी एकाने त्यांना बनावट पुडी दिली, ज्यामध्ये खडे टाकून दागिने असले असे भासवले. वृद्ध दांपत्याला काही वेळाने पुडी तपासल्यावर धक्काच बसला. चार तोळ्याचे गंठण (सुमारे २.८० लाख रुपये), एक तोळ्याचे मंगळसूत्र (७० हजार रुपये) आणि एक तोळ्याची अंगठी (७० हजार रुपये) असा एकूण ४ लाख २० हजार रुपयांचा ऐवज गमावला गेला.

घटनेनंतर वृद्ध दांपत्याने महालगाव पेट्रोल पंपावर परत येऊन आरडाओरडा केला. परिसरात खळबळ उडाली. तारा चव्हाण यांनी वीरगाव पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरोधात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

ही घटना भरदिवसा, गर्दीच्या रस्त्यावर आणि पोलीस असल्याचा बनाव करून घडल्यामुळे गुन्हेगारांचे मनोबल किती वाढले आहे, हे स्पष्ट होते. पोलिसांनी या प्रकाराचा गांभीर्याने तपास करून आरोपींना ताबडतोब पकडणे गरजेचे आहे. नागरिकांनी, विशेषतः वृद्ध व्यक्तींनी, अनोळखी व्यक्तींच्या बोलण्यावर विश्वास न ठेवता सतर्क राहणे आवश्यक आहे. तसेच पोलिसांनी जनजागृती करून भविष्यात अशा घटनांवर आळा बसवावा, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

# पाथर्डीत प्राणिशास्त्र विभागांची तीन दिवसीय व्याख्यानमाला यशस्वीरित्या संपन्न

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी: तालुक्यातील दादापाटील राजळे महाविद्यालय, एआयपीएसएन आणि महाराष्ट्रातील इतर तीन महाविद्यालयांच्या प्राणिशास्त्र विभागांच्या संयुक्त उपक्रमातून दिनांक १९ ते २१ ऑगस्ट रोजी तीन दिवसीय व्याख्यानमाला यशस्वीरित्या संपन्न झाली. ऑल इंडिया पिपल्स सायंटिफिक नेटवर्क (एआयपीएसएन), सहकारमहर्षी स्व. दादापाटील राजळे महाविद्यालय, आदिनाथनगर, कालिकादेवी महाविद्यालय शिरूर कासार, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ, महाराजा जे. पी. वळवी कला, वाणिज्य व व्हि. के. कुलकर्णी महाविद्यालय धडगाव यांच्या प्राणिशास्त्र विभागांच्या वतीने मागील पाच वर्षांपासून ही व्याख्यानमाला आयोजित केली जाते. दरवर्षीच्या या तीन दिवसीय व्याख्यानमालेत आरोग्य, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि शैक्षणिक जागृती या विषयांवर देशभरातील तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली जातात.



याबाबत माहिती अशी की, दि. १९ ऑगस्ट रोजी सर रोनाल्ड रॉस यांच्या नोबेल पुरस्कार स्मृतिदिनानिमित्त जन आरोग्य मंच पुणे येथील डॉ. ज्ञानेश्वर मोटे यांनी आरोग्याची काळजी: जनतेचा मूलभूत अधिकार की व्यवसाय? या विषयावर व्याख्यान केले. दि. २० ऑगस्ट रोजी शहिद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त तसेच राष्ट्रीय वैज्ञानिक दिनानिमित्त अखिल भारतीय पिपल्स सायंटिफिक नेटवर्क (एआयपीएसएन) चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. कृष्णा स्वामी यांनी राष्ट्रीय वैज्ञानिक दिन २०२५: वैज्ञानिक दृष्टिकोनाची आवश्यकता आणि चिकित्सक विचारांची गरज या विषयावर मार्गदर्शन केले. तर दि. २१ ऑगस्ट रोजी कै. दादापाटील राजळे यांच्या जयंतीनिमित्त आणि हशिप्रमं सोनपेठचे संस्थापक अध्यक्ष राजाभाऊ कदम यांच्या स्मृतिदिनानिमित्त विद्याकिरण मिशन, केरळचे सदस्य डॉ. सी. रामकृष्णन यांनी शिक्षणाची सर्वसाधारण उद्दिष्टे व शासनाची भूमिका व जबाबदारी या विषयावर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव आणि विश्वस्त यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्य आयोजक प्राचार्य डॉ. राजधर टेमकर, प्राचार्य डॉ. विश्वास खंदारे, प्राचार्य डॉ. वसंत सातपुते, प्राचार्य डॉ. एस. ए. गायकवाड यांच्यासह आयोजक म्हणून प्रा. डॉ. अतुल चौरपगार, प्रा. डॉ. तन्वीर पठाण, प्रा. डॉ. संतोष रणखांब आणि प्रा. डॉ. सुनील शिंदे यांनी मार्गदर्शन केले. सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतल्याने व्याख्यानमाला यशस्वीपणे पार पडली.

## ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव परंपरागत देशी खेळांच्या क्रीडा महाकुंभाची जल्लोषात सांगता

# शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य देणारे परंपरागत देशी खेळ, संस्कृती संवर्धनाचेही माध्यम-सभापती राम शिंदे

**मुंबई । प्रतिनिधी**

परंपरागत देशी खेळ केवळ शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य देणारेच नाहीत तर या खेळांमुळे संस्कृती संवर्धनाचे बहुमूल्य कामही होत राहील, असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती श्री. राम शिंदे यांनी केले आहे. कुर्ला येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मैदानात आयोजित करण्यात आलेल्या ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव देशी खेळांच्या क्रीडा महाकुंभाचा आज शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिक वितरण आणि समारोप करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त १३ ऑगस्टपासून क्रीडा भारतीच्या सहयोगाने या पारंपरिक देशी क्रीडा महाकुंभचे आयोजन करण्यात आले होते. शिवकालीन खेळांना प्रोत्साहन देऊन नव्या पिढी पर्यंत सांस्कृतिक वारसा पोहोचवण्यासाठी ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव परंपरागत देशी खेळांच्या क्रीडा महाकुंभाचे आयोजन करण्यात आले. परंपरागत खेळांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून आगामी काळात मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्राच्या







कानाकोपऱ्यात परंपरागत देशी खेळांचे आयोजन केले जाईल असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी यावेळी सांगितले. व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक श्रीमती. माधवी सरदेशमुख, क्रीडा भारतीचे अखिल भारतीय महामंत्री श्री. राज चौधरी, क्रीडा भारतीचे अध्यक्ष श्री. गणेश देवरुखकर, मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक श्री. मनोज रेड्डी यावेळी उपस्थित होते. विधान परिषदेचे सभापती श्री. राम शिंदे म्हणाले की, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या माध्यमाने तन-मनाने सुदृढ करणाऱ्या परंपरागत खेळांच्या क्रीडा महाकुंभाचे आयोजन करण्यात आले. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर देशी खेळांचे मैदान अल्पावधीत उभारल्याबाबतही त्यांचे आभार मानतो. परंपरागत देशी खेळ सामान्यतः ग्रामीण भागात खेळले जातात, मात्र लोढा यांनी मुंबई सारख्या शहरात या खेळांचे आयोजन करून खऱ्या अर्थाने देशी खेळांना पुनरुजीवित केले असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. परंपरागत कबड्डी,खो-खो,कुस्ती, पंजा लढवणे,तलवारबाजी,पावनखिंड दौड (मॅरेथॉन)रस्सीखेच, विटी-दांडू, मल्लखांब,फुगडी आणि मंगळागौर यासारख्या १८ देशी खेळांच्या या स्पर्धेत २७ हजार खेळाडूंनी मैदान गाजवले. तर ४५० खेळाडूंना विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि कौशल्य विकास मंत्री श्री.मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यावेळी लेझीमसह लाठीकाठी, तलवारबाजी या साहसी खेळांची प्रात्यक्षिकं ही सादर करण्यात आली.

# विद्यापीठाचा संघर्षमय इतिहास विद्यार्थ्यांनी समजून घेतला पाहिजे-प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल

**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा इतिहास हा संघर्षमय आणि अभिमानास्पद असून, या इतिहासाचे आकलन करून परिसरातील समस्यांचा अभ्यास करणे व त्यावर आधारित संशोधनाद्वारे स्थानिक समाजाला उपयोगी ठरेल असे कार्य करणे ही आजच्या विद्यार्थ्यांची खरी जबाबदारी आहे, असे प्रतिपादन गुरुकुल संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीडचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल यांनी केले. ते विद्यापीठाच्या ६७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रमुख पाहुणे देवनार पोलिस ठाणे, मुंबईचे पोलीस निरीक्षक भगवान नाईकवाडे यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण पार पडले. या प्रसंगी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य प्रा.डी.डी. राऊत, प्रशासकीय अधिकारी अनिता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.डॉ. बांदल यांनी विद्यापीठाच्या नामांतर लढ्याचा इतिहास उलगडताना सांगितले की, १९७८ ते १९९४ या कालावधीत तब्बल १७ वर्षे संघर्ष चालला. अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी विद्यापीठाला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' हे नाव प्राप्त झाले. या चळवळीत गौतम वाघमारे, पोचीराम कांबळे यांसारख्या अनेक कार्यकर्त्यांचे मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.मराठवाड्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा उल्लेख करताना त्यांनी कवी फ.मु. शिंदे यांच्या 'विद्यापीठ गीताचा' संदर्भ दिला. या गीतातून मराठवाड्याची कला, संस्कृती, धार्मिक आणि ऐतिहासिक वैभवाचे चित्रण स्पष्ट होते, असे ते म्हणाले. बीड जिल्हा हा मराठवाड्याच्या इतिहासाचा केंद्रबिंदू असून त्याचा सखोल अभ्यास विद्यार्थ्यांनी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर वाघमारे यांनी केले, तर आभार प्रा. शिल्पा बोराडे यांनी मानले. या वेळी महाविद्यालयातील शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोलगी पोलीस ठाण्यात गणेश मंडळांची बैठक

**मोलगी । रवींद्र वळवी**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोलगी पोलीस ठाणे येथे दिनांक (१६ ऑगस्ट) रोजी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. गणेशोत्सव शांततेत आणि सुरक्षितपणे साजरा करण्याच्या दृष्टीने या बैठकीत पोलीस प्रशासनाकडून मंडळांना महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या. सहायक पोलीस निरीक्षक दीपक पावरा यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

गणेशोत्सवादरम्यान कोणतीही अप्रिय घटना घडू नये यासाठी पोलिसांनी मंडळांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले. आक्षेपार्ह घोषणा, प्रक्षोभक देखावे किंवा फलकांचा वापर टाळावा. तसेच, मिरवणुकांमध्ये महिला आणि लहान मुलांची छेडछाड होणार नाही याची दक्षता घेण्यास सांगितले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, गणेश आगमन आणि विसर्जन मिरवणुकीत डीजे आणि डॉल्बी साऊंडचा वापर करण्यास सक्त मनाई असून, पारंपारिक वाद्यांचाच वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.



मिरवणुका वेळेत सुरू करून वेळेत संपवाव्यात, तसेच मिरवणुकीचा मार्ग ऐनवेळी बदलू नये, अशा सूचनाही देण्यात आल्या. मिरवणुकीत कोणत्याही प्रकारचे शस्त्र, ज्वलनशील पदार्थ किंवा अमली पदार्थांचे सेवन करून सामील होऊ नये, असेही पोलिसांनी स्पष्ट केले. मिरवणुकीत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी मंडळाचे अध्यक्ष आणि पदाधिकारी यांची राहील, असेही सांगण्यात आले. अमली पदार्थ विरोधी जनजागृती या बैठकीत अमली पदार्थ विरोधी सप्ताहाच्या निमित्ताने जनजागृती अभियान संदर्भातही मार्गदर्शन करण्यात आले. अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम आणि व्यसनांपासून दूर राहण्याचे महत्त्व यावर उपस्थितांना माहिती देण्यात आली. या बैठकीला मोलगी परिसरातील ३० ते ३५ गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यात प्रदीप तडवी, गोरख भोई, सुनील वसावे, जगदीश तडवी, प्रकाश सोलंकी, कालू शेठ, आणि राहुल बोरदे यांसह अनेक गणेशभक्त सहभागी झाले होते. तसेच, पोलिस हवालदार धनगर, राहुल महाले आणि अनिल नागरगोजे हेही उपस्थित होते.

# नंदुरबारमध्ये चालीहा महोत्सव उत्साहात साजरा

## १३५ भाविकांनी केला ४० दिवसांचा उपवास

**नंदुरबार । दिपक गोसावी.**

रविवार, २४ ऑगस्ट रोजी नंदुरबार शहरात पूज्य चालीहा साहेब महोत्सवाची सांगता मोठ्या उत्साहात झाली. यंदाचा हा ३० वा वार्षिक महोत्सव होता. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

हा महोत्सव एकूण ४० दिवस चालला, ज्यात १३५ भाविकांनी उपवास केला. 'छमाछम झुलेलाल मंडळ', 'पूज्य झूलेलाल मंदिर', आणि 'पूज्य बाबा गरीबदास सेवा मंडळ' यांनी मिळून या महोत्सवाचे यशस्वी आयोजन केले. जल आणि ज्योतीचे रक्षण व्हावे यासाठी भाविकांनी भगवान झुलेलाल यांची मनोभावे पूजा आणि आरती केली.

या चाळीस दिवसांच्या काळात देशभरातील अनेक सिंधी संत आणि महात्मांनी नंदुरबारला भेट देऊन सत्संग आणि प्रवचनांद्वारे



भाविकांना मार्गदर्शन केले. सांगता समारोहाच्या दिवशी सकाळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी १ वाजता शहरात एका विशाल मटकी शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले. ही शोभा यात्रा दुपारी ४ वाजता झूलेलाल मंदिरात पोहोचली.

याशिवाय, पूज्य गरीबदास दरबार येथे सिंधी समाजासाठी विशाल भंडाऱ्याचे (सामुदायिक भोजन) आयोजन करण्यात आले होते, ज्यात मोठ्या संख्येने भाविकांनी सहभाग घेतला. या सर्व कार्यक्रमांमुळे नंदुरबारमध्ये एक धार्मिक आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# ठाणे घोडबंदर रोडवरील अवजड वाहनांची वाहतूक मध्यरात्री १२ ते सकाळी ६ करा-प्रताप सरनाईक

## रस्ता विलिनीकरणाचे काम ३१ डिसेंबरपर्यंत होणार

**ठाणे** । प्रतिनिधी

घोडबंदर सेवा रस्त्याच्या मुख्य रस्त्यात विलिनीकरणाचे काम पूर्ण होईपर्यंत दिवसा या मार्गावरील अवजड वाहनांची वाहतूक थांबवणे आवश्यक आहे. तरच नागरिकांना वाहतूक कोंडीतून दिलासा मिळू शकेल. त्यामुळे ठाणे वाहतूक पोलिसांनी मिरा-भाईंदर आणि पालघर वाहतूक पोलिसांशी समन्वय साधून घोडबंदर रस्त्यावरील अवजड वाहनांना मध्यरात्री १२ ते सकाळी ६ वाजेपर्यंतच परवानगी द्यावी. त्याबदद्लची अधिसूचना लवकरात लवकर काढावी, असे निर्देष परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. त्याचबरोबर, घोडबंदर सेवा रस्त्याच्या विलिनीकरणाचे उर्वरित काम १५ सप्टेंबरपासून सुरू करून ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्यात यावे.



त्यासाठी एमएमआरडीएने आखलेल्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन व्हावे, असेही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.ठाणे महापालिका क्षेत्रातील विविध विकासकामांबाबत आढावा घेण्यासाठी गुरूवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालय येथील कै. अरविंद पेंडसे सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सहाय्यक संचालक नगररचना संग्राम कानडे, उप जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील , पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, उपनगर अभियंता विकास ढोले, सुधीर गायकवाड, विनोद पवार, गुणवंत झांब्रे, शुभांगी केसवानी, उपायुक्त शंकर पाटोळे, मनीष जोशी, दिनेश तायडे, मधुकर बोडके, बैठकीचे समन्वय अधिकारी कार्यकारी अभियंता संजय कदमल यांच्यासह महापालिका, म्हाडा, एमएमआरडीए यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय साधून कामांची गती चांगली राखली आहे. त्यामुळे १५ ऑक्टोबरपर्यंत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विविध प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन करणे शक्य होईल, असेही परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी स्पष्ट केले.

# पालघर जिल्ह्यात मुसळधार पावसाचा तडाखा-रस्ते, रेल्वे वाहतूक विस्कळीत

**पालघर । प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने आज पालघर जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत केले आहे. अनेक गावांचा संपर्क तुटला असून रस्ते आणि रेल्वे वाहतूक ठप्प झाली आहे.वसई-विरार परिसरात रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने दुपारच्या सुमारास विरार, वैतरणा, सफाळे, पालघर, बोईसर, वाणगाव आणि डहाणू स्थानकांवर गाड्या थांबवाव्या लागल्या. त्यामुळे प्रवाशांचे मोठ्या प्रमाणावर हाल झाले. दुपारी तीननंतर लांब पल्ल्याच्या गाड्यांना मध्येच थांबा देण्यात आला. त्यानंतर लोकल सेवा टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आल्याने ठिकठिकाणी अडकलेले प्रवासी घरी परतू शकले.

दरम्यान, पावसामुळे जिल्ह्यातील प्रमुख रस्ते पाण्याखाली गेले आहेत. डहाणू तालुक्यातील डहाणू-कासा मार्गावरील गंजाड गावाजवळ रस्ता बंद झाला आहे. विक्रमगड तालुक्यातील पाचमाड आणि वीचघर पूल वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले आहेत. शेलतेदहेरी, दादूहरे आणि भोईपोली परिसरातील महामार्ग बंद झाला आहे. वाडा तालुक्यात अंबरभुई ते वाडा गावाचा मार्ग ठप्प झाला असून वसई तालुक्यातील अंतर्गत



रस्त्यांवर पाणी साचले आहे.दुपारी पावसाचा जोर काहीसा ओसरल्याने रस्त्यांवरील पाणी कमी होऊ लागले आणि काही ठिकाणी वाहतूक धिम्या गतीने सुरू करण्यात आली. मात्र पालघर, जव्हार, तलासरी आणि मोखाडा तालुक्यांत अजूनही पावसाचा तडाखा कायम आहे.नद्यांची पाणीपातळी झपाट्याने वाढत असल्याने पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने सतत लक्ष ठेवले असून पोलिस व आपत्कालीन यंत्रणा सतर्क आहेत. नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा तसेच नदी-ओढ्यांच्या काठावर न जाण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# 'ऑनलाइन गेमिंगचे नियमन आणि प्रोत्साहन विधेयक, २०२५' लोकसभेत सादर

## खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या प्रयत्नांना मोठे यश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचे आणि वेगाने वाढणारे क्षेत्र असलेल्या ऑनलाइन गेमिंगमुळे निर्माण झालेल्या गंभीर समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी कर्तव्यदक्ष खासदार प्रतिभा धानोरकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. संबंधित आमदार असताना देखील विधानसभेत याबाबतच्या आवाज उठवला होता. सत्यासोबतच विद्यमान मंत्र्यांना याबाबत पत्र व्यवहार करण्यात आला होता. त्यासोबत कठोर कारवाई करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र व्यवहार केला होता. त्यांच्या या कठोर परिश्रमामुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मोठे यश मिळाले आहे. या गंभीर समस्येची दखल घेत, आज लोकसभेत माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स मंत्रालयाचे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी 'ऑनलाइन गेमिंगचे नियमन आणि प्रोत्साहन विधेयक, २०२५' सादर केले आहे.

हे विधेयक अनेक महत्त्वपूर्ण उद्दिष्टांसह आणले गेले आहे. ऑनलाइन मनी गेम्समुळे अनेक लोक कर्जबाजारी झाले असून, काही ठिकाणी व्यसनाधीनतेमुळे आत्महत्या करण्यासारख्या गंभीर घटना घडल्या आहेत. हे विधेयक अशा ऑनलाइन मनी गेम्सवर पूर्णपणे बंदी घालण्याची तरतूद करण्यात आली आहे, जे वापरकर्त्यांकडून आर्थिक लाभाच्या अपेक्षेने खेळले जातात. याचा मुख्य उद्देश, विशेषतः तरुण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ व्यक्तींना व्यसनाधीनतेपासून आणि सामाजिक, आर्थिक व मानसिक हानीपासून संरक्षण देण्यात आले आहे. तसेच, या विधेयकात ऑनलाइन मनी गेम्सशी संबंधित आर्थिक फसवणूक, मनी-लॉण्ड्रिंग आणि करचोरी यांसारख्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध घालण्यात येणार आहे. या विधेयकात ई-स्पोर्ट्स, शैक्षणिक आणि सामाजिक खेळांना प्रोत्साहन देण्याची तरतूद आहे. यासाठी एक स्वतंत्र 'ऑनलाइन गेमिंग प्राधिकरण' स्थापन केले जाईल, जे या खेळांना मान्यता देईल आणि त्यांचे नियमन करण्यात येणार आहे. ऑनलाइन मनी गेमिंग सेवांचा वापर दहशतवादाला निधी पुरवण्यासाठी केला जात असल्याच्या अहवालांच्या पार्श्वभूमीवर, हे विधेयक राष्ट्रीय सुरक्षेसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. सध्या या क्षेत्रासाठी कोणतीही समर्पित संस्था किंवा कायदेशीर चौकट नाही. हे विधेयक एकसमान आणि राष्ट्रीय स्तरावरील कायदेशीर चौकट तयार करेल, ज्यामुळे या उद्योगाची रचनाबद्ध वाढ होईल.खासदार प्रतिभा धानोरकर यांनी संसदेत आणि संसदेबाहेर ऑनलाइन मनी गेम्सच्या धोक्याबद्दल सातत्याने आवाज उठवला होता. त्यांनी या खेळांमुळे कुटुंबांमध्ये निर्माण झालेल्या समस्या, युवकांवर होणारे नकारात्मक परिणाम आणि आर्थिक नुकसानीकडे सरकारचे लक्ष वेधले होते. त्यांच्या या योगदानामुळेच केंद्र सरकारने या विषयाची गंभीर दखल घेतली आणि आज हे महत्त्वाचे विधेयक संसदेत सादर झाले. हे विधेयक ऑनलाइन गेमिंग क्षेत्राला सुरक्षित, जबाबदार आणि प्रगतीशील बनवण्यासाठी एक मैलाचा दगड ठरणार आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077